## नियमित दिवाणी दावा क्र. ४१८/२०१८.

श्रीमती सुमन गणपती भुसारी व इतर विाा मिलींद तानाजी शिंदे व इतर
CNR No.- MHST070051132018.

## <u>निशाणी क्र. ७२ वरील आदेश</u>

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ब यांनी विलंब माफ होवून विनाकैफियत आदेश रद्द करुन त्यांची कैफियत स्विकारणेबाबत दाखल केला आहे. संबंधीत प्रतिवादीचे कथन आहे की, संबंधित प्रतिवादी महिला असून सद्या फलटण जिल्हा सातारा येथे राहत असून त्यांना कायद्याचे ज्ञान नाही. तसेच, त्यांना वेळेत कागदपत्रांची उपलब्धता न झालेने वकिलांची भेट घेवून माहिती देता आली नाही. सबब, संबंधीत प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज मंजूर करून विलंब माफ करून विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांची कैफियत स्विकारणेबाबत विनंती केली आहे.

०२. वादीच्या वतीने सदर अर्जाच्या मागील पृष्ठावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे. वादीच्या वतीने कथन आहे की, अर्ज व त्यामध्ये नमूद कारण संयुक्तिक असलेने रक्कम रु.५००/– खर्चासह मंजूर करण्यात यावा.

०३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०४. प्रस्तुत अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो...** |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ करीता :-**

०५. अभिलेखाचा विचार करता, संबंधीत प्रतिवादीस दाव्याची समन्स बजावणी झाल्यानंतर ते निशाणी क्र.७० वरील दि. १३/११/२०२४ रोजीचे वकीलपत्र दाखल करून हजर झाले. त्यानंतर दि.०८/०९/२०२५ रोजी संबंधीत प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०६. अभिलेखाचे अवलोकन करता संबंधीत प्रतिवादी याने हजर झाल्यानंतर नि.क्र.६९ नुसार मुदत वाढ मिळणेबाबत अर्ज दाखल केला होता व तो मंजूर देखील केला आहे. तथापी त्यानंतर दिनांक ०८/०१/२०२५ ते ०८/०९/२०२५ या कालावधी मध्ये विलंब झाला आहे. वादपत्रामध्ये संबंधित प्रतिवादी यांचा पत्ता विचारात घेता त्या फलटण येथील रहिवासी असल्याचे नमूद आहे. त्यावरून अर्जातील कथनांमध्ये तथ्य दिसून येते. त्यामुळे अर्जातील कथनांवर अविश्वास ठेवण्याचे कारण नाही. प्रस्तुत दावा जाहीर ठराव व निरंतर ताकीदी संदर्भात आहे. दावा मिळकत स्थावर मालमत्ता आहे. त्यामुळे, मी या मतास आलो आहे की, अर्जात नमुद कारण विलंब माफ करणेस पुरेसे आहे. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता, उभय पक्षकारांची वादकथने अभिलेखावर दाखल असणे जरूरीचे आहे. अर्ज मंजूर केल्यास वादीचे काही एक नुकसान होणार नाही, तसेच वादाचे निवारण दुतर्फा गुणदोषावर होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास संबंधीत प्रतिवादीस नैसर्गीक न्यायतत्व नाकारले जावून प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :-**

०७. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. अर्जात नमुद कारण विलंब माफ करणेस पुरेसे आहे. तथापि, दि. १३/११/२०२४ ते प्रस्तुत अर्ज

दाखल दि. ०८/०९/२०२५ या एकूण ०९ महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधीत प्रतिवादीने कैफियत दाखल करणेस विलंब केला आहे. त्यामुळे, वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, संबंधीत प्रतिवादीवर वाजवी खर्च एकूण ०९ महिन्यांकरीता प्रतिमाह करीता रक्कम रू.१००/–बसवणे न्यायाचे व योग्य आहे. सबब, मी न्यायाच्यादृष्टीने पुढील आदेश करीत आहे;

## <u>आदेश</u>

१) संबंधीत प्रतिवादी क्र.२ब यांचा विलंब माफ होवून विना कैफियत आदेश रद्द होवून त्याची कैफियत स्विकारणेबाबतचा अर्ज निशाणी क्र. ७२, संबंधीत प्रतिवादीवर खर्च रक्कम रू. ९००/– बसवून मंजूर करण्यात येतो.

२) संबंधीत प्रतिवादीने खर्चाची रक्कम पुढील तारखेस अगर तो पर्यंत वादीस देववावी.

३) संबंधीत प्रतिवादीने आदेशाची पुर्तता केल्यास, त्याची कैफियत अभिलेखावर स्विकारण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2025.10.28 16:25:17 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :– २८/१०/२०२५.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि.सातारा.